जाहीर नोटीस

जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांचे इमारतीमधील अभिलेख कक्ष क्र. ५५ व ६७, मुद्देमाल खोली क्र. ५० तसेच ग्रंथालय खोली क्र. ५, ६ व ७ येथे "किटकनाशक व वाळवी प्रतिबंधक" औषध फवारणी अंतर्गत उपाययोजना करणेसाठी याद्वारे दरपत्रके मागविणेत येत आहेत.

अटी व शर्ती

१) दरपत्रक आवश्यक त्या संपुर्ण तपशिलासह तारखेसहीत, बंद लखोटयामधून मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग, मु.ओरोस यांचे नावे असावे. सदर लखोटयावर "किटकनाशक व वाळवी प्रतिबंधक औषध फवारणी अंतर्गत उपाययोजना करणेसाठी दरपत्रक" असे नमूद असावे.

२) दरपत्रकामध्ये SGST/CGST क्रमांक नमूद करावा. तसेच दुकानाचे लायसन्स, पॅनकार्ड, पासबुकच्या पहील्या पानाची झेरॉक्स प्रत व रद्द केलेला चेक दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

३) जंतुनाशक फवारणीचा अभिलेख कक्षातील कागदपत्रांवर, मुद्देमालातील वस्तुंवर व ग्रंथालयातील पुस्तकांवर तसेच तेथील काम करणा—या कर्मचा—यांवर कोणत्याही प्रकारचा अनिष्ट परिणाम होणार नाही तसेच कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची काळजी घेणेत यावी.

४) पुरवठादार यांनी स्वत:च्या यंत्रसामग्रीने व स्वखर्चाने संबंधीत कक्षांमध्ये जावून कार्यालयीन वेळेत फवारणी करावयाची आहे.

५) फवारणी झाल्यानंतर तेथील कपाटे, रॅक, फर्निचर, मद्देमाल इ. वस्तु सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी संबंधीत पुरवठादार यांची रहाणार आहे.

६) फवारणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच देयकाची रक्कम अदा करणेत येईल. सदरची देयके ही प्रत्येक फवारणी करीता वेगवेगळी राहतील याची दखल घेणेत यावी.

७) जाहीर नोटीसमध्ये दिलेल्या मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

८) सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक ज्यांचे असेल त्यांचे दरपत्रकाचा विचार करणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

९) अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग यांचा राहील.

तरी, इच्छुकांनी पुढील अटी व शर्तीस अधीन राहून दि. २३/०५/२०२५ पर्यंत आपली दरपत्रके जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग, मु.ओरोस येथे सादर करावीत.

दिनांक :— १३/०५/२०२५

प्र.सहाय्यक अधीक्षक (वित्त),
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग

.....

म.जा.क्र.ग्रंथा./२५२१ सन २०२५
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग—ओरोस
दिनांक :— १३/०५/२०२५

प्रत माहितीसाठी व जरुरत्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

१. मा. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), सिंधुदुर्ग—ओरोस (ई—मेलद्वारे)
२. मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग—ओरोस (ई—मेलद्वारे)
३. मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग—ओरोस (ई—मेलद्वारे)
४. मा. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड, दोडामार्ग (ई—मेलद्वारे)
५. मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग—ओरोस (ई—मेलद्वारे)
६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग—ओरोस(ई—मेलद्वारे)
७. मा.जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग—ओरोस यांचे नोटीसबोर्डवर तसेच संकेतस्थळावर
८. डी.एस्.ए., जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांचेकडे जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता